स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये विवाहित महिला उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्र व मतपत्रिकेवरील नावाबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.०१/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १३ मार्च, २०२५

संदर्भ:-१.क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का.५, दि.०१/०४/२०१७.

भारतीय संविधानातील कलम २४३-के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या संदर्भात अधीक्षण, संचालन व नियंत्रण करणे यासोबतच निवडणुका मुक्त, निर्भय व शांत वातावरणात पार पाडणे तसेच निवडणूक प्रक्रियेची शुद्धता अथवा पावित्र्य राखणे याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

ज्याअर्थी, निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या विवाहित महिलांनी नामनिर्देशन पत्रांवर विवाहापूर्वीचे नाव किंवा विवाहानंतरच्या नावांपैकी नेमके कोणते नाव नमूद करावे, याबाबत संभ्रम असल्याचे निदर्शनास आणण्यात आले;

ज्याअर्थी, निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांचे बाबतीत त्या यथोचितरित्या नामनिर्देशित झाल्यानंतर, संबंधित मतपत्रिकेवर त्यांचे विवाहापूर्वीचे नाव असावे अगर विवाहानंतरचे नाव असावे याबाबत कोणत्याही सूचना/ आदेश नसल्याबाबत निदर्शनास आणण्यात आले;

त्याअर्थी निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिलांच्या बाबतीत नामनिर्देशनपत्र तसेच मतपत्रिकेवर नाव कशा प्रकारे असावे याबाबत पुढील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे....

## आदेश

१. निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक उमेदवाराचे नाव संबंधित मतदार यादीमध्ये असणे ही आवश्यक अर्हता आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र सादर करताना अशा इच्छूक उमेदवारांना (महिला उमेदवारांसह), त्यांचे संबंधित मतदार यादीमध्ये असलेल्या नावानेच नामनिर्देशन पत्र दाखल करणे आवश्यक आहे.

२. निवडणूक लढविण्यासाठी नामनिर्देशन पत्र सादर केलेल्या विवाहित महिला उमेदवारास, मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर सदर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करता येईल.

३. सदर अर्जासोबत त्यांनी ज्या नावाचा उल्लेख मतपत्रिकेवर करावयाचा आहे त्या पुष्ठर्थ आवश्यक पुरावे उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्रात प्रसिध्द केलेले विवाहानंतरचे नाव इ., सादर करणे अनिवार्य असेल. उक्त नमूद प्रमाणपत्र तसेच राजपत्र उपलब्ध नसल्यास, मतदाराने

मतदान करण्यापुर्वी आपली ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का.५ दि.०८/११/२०११ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या १७ पुराव्यांपैकी, अशा उमेदवाराचे त्यास हवे असलेल्या नावांसहीत छायाचित्र असलेला कोणताही एक पुरावा सादर करणे आवश्यक असेल.

४. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवाराने सादर केलेले पुरावे लक्षात घेऊन वैधरित्या नामनिर्देशित व अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करतांना व पर्यायाने मतपत्रिका तयार करतांना या सुधारित नावाचा समावेश करण्याबाबत निर्णय घ्यावा.

५. वैधरित्या नामनिर्देशित व निवडणूक लढविणाऱ्या विवाहित महिला उमेदवाराने विवाहापूर्वीचे तसेच विवाहानंतरचे नाव मतपत्रिकेवर जोडून छापण्याची विनंती केली तर अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करतांना मतदार यादीतील नावापुढे विवाहानंतरचे/ पूर्वीचे नाव देखील कंसात छापण्याची परवानगी देता येईल. मात्र अशी अनुमती देताना ईलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर, नाव मुद्रीत करण्यासाठी मुक्रर करण्यात आलेल्या जागेचाच व विहीत फॉंटचा वापर होईल, याची दक्षता घ्यावी (संदर्भ राज्य निवडणूक आयोगाचे दि.०३/०२/२०१७ रोजीचे आदेश).

६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमधील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीत व मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे घेतांना, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल त्या स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत लागू असलेल्या तरतुदीनुसार सदर यादीत व मतपत्रिकेवर नावाचा क्रम लावण्यात यावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(सुरेश काकाणी) २३.०३.२०२५

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
३. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. सर्व जिल्हाधिकारी,
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
७. सर्व महानगरपालिका आयुक्त
८. सर्व प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन
९. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती
१०. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
११. निवड नस्ती.